युद्ध आणि मटार

मायकेल फोरमन



सिंह उदास होता. त्याच्या राज्यातील पशुपक्षी भुकेले होते. दीर्घ काळ तिथे पाऊस पडला नव्हता. त्यामुळे झाडेझुडपे मरून गेली होती. जंगलात खायला काही शिल्लक उरले नव्हते. पण जवळच्याच जंगलात खाण्यापिण्याची ददात नव्हती. सिंहाने शेजारच्या राजाकडे आपल्या भुकेल्या प्रजेसाठी अन्न मागायचे ठरवले.

लेखकाने ही कथा जगात शांती आणि सद्भावना पसरवण्याचा उदात्त हेतू ठेवून लिहिलेली आहे.

कथेच्या अखेरीस, सत्याचा विजय होतो. त्यामुळे लहानथोर साऱ्यांनाच ही कथा वाचून आनंद होईल.

युद्ध आणि मटार

मायकेल फोरमन



सिंह आपल्या राज्याची दुर्दशा पाहून व्यथित झाला होता. दीर्घ काळ त्याच्या राज्यात पाऊसपाणी झाले नव्हते. तेथील जमीन शुष्क, ओसाड बनली होती. त्या जमिनीत काहीही उगवू शकत नव्हते. राज्यात खायला अन्न शिल्लक राहिले नव्हते.


पक्षी बियाणे शोधून आणण्यासाठी उडून गेले होते. मोठ्या प्राण्यांनी नवीन झाडे लावण्यासाठी जमिनीत खड्डे खोदले होते.



पण शेजारच्याच राज्यात अन्नधान्य विपुल होते. राजा सिंहाने प्रजेला आश्वासान दिले की आपण शेजारच्या राजाकडे मदत मागू.



सिंह आपल्या अन्नधान्य विभागाच्या मंत्र्याला सोबत घेऊन शेजारच्या राज्यात जाण्यास निघाला. हा मंत्री पूर्वी धान्याच्या किराणा दुकानात काम करत असे. दीर्घ प्रवासादरम्यान राजाने या तरूण मंत्र्याला जुन्या दिवसांबद्दल बऱ्याच गोष्टी सांगितल्या. तेव्हा त्यांचे राज्य जगभर कसे पसरले होते, सारे पशुपक्षी जंगलांमधून आणि गवताच्या कुरणांमधून मुक्तपणे कसे भटकत असत वगैरे. शेवटी त्यांना शेजारच्या राज्याच्या सीमेवरील डोंगर दिसू लागले.





शेजारच्या राज्यात प्रवेश केल्यावर तेथील समृद्धी पाहून दोघेही प्रभावित झाले. “नक्कीच यांच्याकडे गरजेपेक्षा जास्त अन्नधान्य असावं,” मंत्रीमहाशयांना आशेचा किरण दिसू लागला.

अचानक त्या राज्याचे सैनिक तिथे आले. त्यांनी राजा आणि मंत्र्याला पकडले. सैनिक त्या दोघांना राज्याच्या मुख्य चौकात घेऊन गेले.



तिथे त्या राज्याचा जाडजूड राजा त्याच्या जाडजूड दरबाऱ्यांसोबत बसला होता. सिंह आणि मंत्र्याने पूर्वी कधीही एवढा स्थूल राजा पाहिला नव्हता. “माझ्या राज्यात शिरण्याची आगळीक कशी केलीत तुम्ही?” स्थूल राजाने गर्जना केली.

“मी सुद्धा आपल्यासारखाच एक राजा आहे, महाराज,” सिंह म्हणाला. “तू खूप बारीक आहेस. तू राजा असूच शकत नाही. या दोघांना तुरुंगात डांबा,” स्थूल राजा किंचाळला.

“आम्ही फक्त आपल्याकडे असलेलं अतिरिक्त अन्न मागण्यासाठी इथे आलोय,” अस्वस्थपणे मंत्री म्हणाले, “आमची प्रजा भुकेने मरत आहे.”


“तुम्ही भिकारी आहात?” जाडजूड राजा किंचाळला. “आम्ही तुमची पर्वा का करायची? आम्ही का त्रास सहन करायचा?

“आम्ही स्वत: अन्न नेण्याची व्यवस्था करू,” सिंह म्हणाला.

“तुम्ही लुटारू आहात,” सिंहाने डरकाळी फोडली. “यांना अटक करा. अssssब! बघा, यांच्यामुळे माझं पोट खराब झालं.”



सिंह आणि मंत्री यांनी कशीतरी आपली सुटका करून घेतली. आपल्या सायकलवर टांग मारून ते वेगाने तिथून पसार झाले. त्या राज्याचे जाडजूड सैन्य दोघांचा पाठलाग करू लागले.



पण ते सैनिक खूप जाडजूड होते. ते रणगाड्याच्या आत बसल्यावर चालकाला हालचाल करणे कठीण झाले. तो रणगाडा नीट चालवू शकत नव्हता. खूप वजनामुळे ट्रकचे टायर फाटले आणि चाकात अडकू लागले. घोडदळ तर अगदीच कुचकामी ठरले.



जाडजूड सैन्य सिंह आणि मंत्र्याचा पाठलाग करत आपल्या राज्याची सीमा ओलांडून दूर पुढे गेले. त्यांच्यामागे जाडजूड राजा आणि सैन्यासाठी अन्नधान्याने भरलेले ट्रक धावत होते.



जाडजूड सैन्य एवढे सावकाश पुढे सरकत होते की सिंहाला आणि मंत्र्याला आपल्या राज्याच्या लोकांना सावधगिरीचा इशारा देण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला. जेव्हा जाडजूड राजा, त्याचे सैन्य आणि अन्नधान्याने भरलेले ट्रक सिंहाच्या राज्यात पोहोचले तेव्हा तेथील भुकेलेले पशुपक्षी आधीपासूनच तयारीत होते.




जाडजूड सैनिक भुकेल्या प्राण्यांना अडवेपर्यंत प्राण्यांनी अन्नधान्याच्या ट्रकवर कब्जा केला. त्यांनी जाडजूड सैन्यावर चोहोबाजूंनी हल्ला केला.



तेव्हाच शेकडो बियाणे घेऊन पक्षी परतले.



त्याचवेळी पाऊस सुरू झाला.




सर्वत्र मातीचा चिखल झाला. सैनिकांचे पाय चिखलात रुतू लागले.

“खूप झालं!” जाडजूड राजा रडवेला झाला. “आमची मदत करा.”

“महाराज, सावरा स्वत:ला,” अचानक सिंह ओरडला. एक स्ट्रॉबेरी केक हवेतून उडत जाडजूड राजावर येऊन आदळला.

“आपल्या सैन्याला अन्न पुरवण्यासाठी तुम्ही एवढं कष्ट घेता. पण एका भुकेल्या राज्याला अन्न द्यायचं म्हटलं की तुम्हाला त्रास होतो!”



मग सिंहाने पराभूत जाडजूड राजाकडे पाहून स्मित केले.

“काही झालं तरी तुम्ही आमची मदत केलीय,” सिंह म्हणाला. “आमच्या शेतांकडे बघा. तुमच्या सैन्याच्या ट्रकनी आमची जमीन छान नांगरून ठेवलीय. आता त्यात रुजवलेली बियाणं अंकुरतील आणि आम्हा सगळ्यांना भरघोस अन्न देतील.”




“अssssब!” जाडजूड राजाने पुन्हा ढेकर दिली.

“पीssssस (Peace शांती),” सिंह म्हणाला.

“नाही, नाही,” जाडजूड राजाने नापसंती व्यक्त केली, “पीज (Peas मटार) चं नावसुद्धा घेऊ नका.”

“पीssssस (Peace शांती)!” सिंह पुन्हा उद्गारला.

“पीस! याबद्दल मी कधी ऐकलं नाही,” जाडजूड राजा म्हणाला, “पीस कसं बनवतात?”



समाप्त